Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 17/07/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## नावाजलेले संगीतकार स्नेहल भाटकर



स्नेहल भाटकर ऊर्फ वासुदेव गंगाराम भाटकर हे मराठी चित्रपट, मराठी नाटके, हिंदी चित्रपटांतील नावाजलेले संगीतकार होते. त्यांचा जन्म १७ जुलै १९१९ रोजी प्रभादेवी येथील पालखीवाडीत झाला. श्रीकृष्ण संगीत विद्यालयात त्यांनी गाण्याचे धडे गिरवले. "एचएमव्ही' या कॅसेट कंपनीमधील प्रवेशामुळे भाटकरबुवांच्या कारकिर्दीला खऱ्या अर्थाने वळण मिळाले. येथे त्यांनी आपल्या प्रतिभेने संगीत दिग्दर्शक बनण्यापर्यंत मजल मारली.

बाबूराव पेंटर यांची निर्मिती असलेल्या "रुक्मिणी स्वयंवर' या चित्रपटाद्वारे भाटकरबुवांना संगीत दिग्दर्शक बनण्याची प्रथम संधी मिळाली. या चित्रपटात ललिता फडके यांनी गायलेल्या "कुहू कुहू बोल ग, चंद्रमा मनात हसला ग', "धाडिला प्रीतीदूत माझा देईल का ग मान' या गाण्यांना भाटकरबुवांनी संगीत दिले होते.

मधुबाला, गीता बाली, नूतन, तनुजा या नायिकांच्या पहिल्या चित्रपटांना त्यांनीच संगीत दिले होते. तसेच कमळाबाई मंगळूरकर, कमला कोटणीस, शोभना समर्थ, बेगम पारा, लीला चिटणीस, शुभा खोटे या नायिकांनी चित्रपट निर्मिती क्षेत्रात पदार्पण केले तेव्हा, आपल्या चित्रपटांच्या संगीताची जबाबदारी भाटकरबुवांवरच सोपवली होती. "विसावा विठ्ठल', "वारीयाने कुंडल हाले', "जववरी रे तववरी' ही त्यांची मराठी गीतेही खूप गाजली होती.

"नीलकमल', "सुहागरात', "हमारी बेटी', "गुनाह', "हमारी याद आयेगी', "प्यासे नैन', "छबिली' इत्यादी हिंदी चित्रपटांतील त्यांचे संगीत गाजले होते. "रुक्मिणी स्वयंवर', "नंदकिशोर', "चिमुकला पाहुणा', "मानला तर देव', यांसह अनेक मराठी चित्रपटांनाही त्यांनी संगीत दिले होते. "नंदनवन' (मो. ग. रांगणेकर), "राधामाई' (गो. नी. दांडेकर), "भूमिकन्या सीता' (मामा वरेरकर), "बुवा तेथे बाया' (आचार्य अत्रे) या नाटकांचेही त्यांनी संगीत दिग्दर्शन केले होते. दिल्लीत भाटकर यांना 'महाराष्ट्रभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. स्नेहल भाटकर यांचे २९ मे २००७ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Jul 17, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401